# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.10.2025** **वार:सोमवार**

1. मंडणगड दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते उद्घाटन
2. मंडणगड इथल्या न्यायालयाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं सामाजिक आणि आर्थिक समानतेचं स्वप्न पूर्ण होईल-सरन्यायाधीशांचं प्रतिपादन
3. दिल्ली क्रिकेट कसोटीमध्ये वेस्ट इंडिजवर फॉलो ऑनची नामुष्की; तर महिला क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाची भारतावर मात आणि
4. येत्या 15 तारखेपासून राज्यात पुन्हा पावसाचा इशारा

**<u>न्यायालय-रत्नागिरी</u>**

मंडणगड इथं झालेल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, अशी आशा देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल मंडणगड इथं व्यक्त केली. रत्नागिरी जिल्ह्यातल्या मंडणगड इथं दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचं उद्घाटन काल त्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

न्यायालयाच्या आवारातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरणही यावेळी करण्यात आलं. नव्या न्यायालयाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचं समानतेचं स्वप्न साकार होईल, असं सरन्यायाधीश यावेळी म्हणाले......

**आज आपण बघतो आहोत की देश प्रगतीपथावरती आहे. देश एक संघ आहे. देशामध्ये इंटरनल इमर्जन्सी सुद्धा आल्या. परंतु देश हा अखंड राहिला. आणि जेव्हा आपण आपल्या शेजाऱ्यांसोबत आपल्याला आपण कंपेअर करतो. मग ते नेपाळ असो किंवा बांगलादेश असो किंवा श्रीलंका असो तिथली परिस्थिती आणि आपली परिस्थिती यामध्ये जो अतिशय डिफरन्स आहे तो माझ्या मते भारतीय राज्यघटनेमुळेच आहे. न्याय हा पक्षकाराच्या दारात पोहोचला पाहिजे आणि म्हणून ठिकठिकाणी न्यायालय उभा करतो. या इमारतीतून शेवटच्या नागरिकाला जो लास्ट सिटिझन आहे, त्याला कमीत कमी वेळात आणि कमीत कमी खर्चात न्याय मिळेल या दृष्टीनं आपण सर्वजण प्रयत्न राहाल. अशी अपेक्षा व्यक्त करतो. जेणेकरून बाबासाहेबांचं सामाजिक आणि आर्थिक समानतेचं स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीनं आपण ती एक फुल फुलाची पाक म्हणून तो एक त्यांना श्रद्धांजली राहील, आदरांजली राहील.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे इथल्या स्मारकाच्या आराखड्याला वेग देण्याचं काम करु, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. डॉक्टर आंबेडकरांचं मूळ गाव ज्या मंडणगड तालुक्यात आहे, त्या मंडणगडमध्ये झालेलं हे न्यायालय अतिशय महत्त्वाचं आहे, असं सांगताना मुख्यमंत्री म्हणाले...

**हे न्यायालय याकरता महत्त्वाचं आहे की आज आपण विचार केला तर इथनं रत्नागिरी जवळपास दीडशे किलोमीटर आहे. जवळपास चार साडे चार लाख लोकांना हे न्यायालय मध्यवर्ती पडणार आहे. त्याच्यामुळे लोकांचा जो काही प्रवास आहे तो प्रवास हा मोठ्या प्रमाणात वाचणार आहे. लोकांचे पैसे त्याच्यामध्ये वाचणार आहे. त्याची गती देखील मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. आणि म्हणूनच मला असं वाटतं की केवळ एक इमारत किंवा एक न्यायालय नाही तर लोकांकरता न्यायदानाची व्यवस्था एक गतिशील व्यवस्था या निमित्ताने तयार झालेली आहे.**

न्यायपालिकेचं नेतृत्व आणि सरकारची इच्छाशक्ती एकत्र आली की न्याय सर्वापर्यंत पोहोचतो, मंदिरं उभारण्याबरोबरच न्यायमंदिरं उभारणंही पुण्याचं काम आहे,असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. या वेळी बांधकाम कामगारांचाही प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला.

**<u>ब्लूफ्लॅग मानांकन-रायगड</u>**

राज्यातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं 'ब्लू फ्लॅग मानांकन' प्रमाणपत्र मिळालं आहे. रायगड जिल्ह्यातले श्रीवर्धन आणि नागाव, पालघरमधील पर्णका, तसंच रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर आणि लाडघर या किनाऱ्यांनाब्लू फ्लॅग मानांकन प्राप्त झालं आहे. महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी नुकतीच याबाबतची माहिती दिली. डेन्मार्क मधल्या फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन संस्थेकडून जागतिक पातळीवर स्वच्छ, सुंदर समुद्र आणि पर्यावरण पूरक किनाऱ्यांना ब्लू फ्लॅग मानांकन दिलं जातं. पर्यावरण शिक्षण आणि व्यवस्थापन, जल गुणवत्ता, सेवा सुरक्षा या सारख्या 33 निकषांचं मूल्यमापन करून ब्ल्यू फ्लॅग दर्जा दिला जातो.

**<u>बिल्डथॉन</u>**

देशातील शालेय स्तरावरील हॅकेथॉन स्पर्धा, 'विकसित भारत बिल्डथॉन 2025' आज आयोजित करण्यात आली आहे. सकाळी 10 ते रात्री 11 वाजेपर्यंत ही स्पर्धा भरवण्यात आली आहे. देशभरातील शाळांमधील इयत्ता 6 वी ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम बनवणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यावर्षीची स्पर्धा, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे. या स्पर्धेतील, राष्ट्रीय स्तरावरील 10, राज्यस्तरावरील 100 आणि जिल्हास्तरावरील 1 हजार विजेत्यांना एकंदर 1 कोटी रुपयांची पारितोषिके वितरीत करण्यात येतील.

**<u>सामंजस्य करार</u>**

प्रत्येक विद्यार्थ्याचं गणित आणि विज्ञान विषयातील पायाभूत ज्ञान दृढ करण्याच्या उद्देशानं शासन 'डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम' राबवत आहे. यासाठी शासनानं खान अकॅडमीबरोबर सामंजस्य करार केला आहे. सुमारे 50 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल. या कार्यक्रमा अंतर्गत वर्ष 2025-26 मध्ये राज्यातल्या सुमारे 62 हजारांहून अधिक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीसाठी गणित आणि विज्ञान विषयाची शैक्षणिक सामग्री अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत समाविष्ट केली जाईल. मराठी आणि इंग्रजी भाषेतल्या चित्रफिती शिक्षकांना अध्यापनात मदत करतील. तसंच विद्यार्थ्यांना धडे आणि सराव प्रश्नांसाठी चित्रफितींमुळे संकल्पना स्पष्ट होण्यास मदत मिळेल.

**<u>दिवाळी खरेदी</u>**

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुण्यासह राज्यातील सर्वच शहरांच्या बाजारपेठेत उत्साहाचं वातावरण आहे. आकाश कंदील, पणत्या, रांगोळ्या, सजावटीचं साहित्य, मिठाई फराळ या बरोबरच मौल्यवान दाग-दागिने, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तूनी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. पुण्यात दिवाळीच्या खरेदीसाठी कालच्या रविवारच्या सुटीचा मुहूर्त साधत ग्राहकांनी प्रचंड गर्दी केली होती. त्यामुळे मध्य भागातील पेठामध्ये तसंच शहरातील प्रमुख रस्त्यांवरही सातत्यानं वाहतूक कोंडी होत होती.

**<u>कृत्रिमफुले-सोलापूर</u>**

दरम्यान दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी कृत्रिम फुलांची विक्री होत आहे, प्लास्टिक पॉलिथिन पासून बनलेल्या कृत्रिम फुलांमुळे नैसर्गिक फुलशेती करणारा शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्याचवेळी प्लास्टिक पॉलिथिनमुळे निसर्गाची हानी होत आहे, या कृत्रिम फुलांना कायमस्वरूपी बंदी घालावी अशी मागणी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे केली आहे. याबाबतीतला शासन निर्णय अद्याप झाला नसून या फुलांच्या विक्रीवर तातडीनं बंदी घालण्याची मागणी सोलापूरमधील पर्यावरण प्रेमी करत आहेत.

**<u>हर्षवर्धन सपकाळ</u>**

माहिती अधिकार कायदा सक्षम बनवण्यासाठी आवाज उठवण्याची गरज असल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. काँग्रेस सरकारनं आणलेल्या माहिती अधिकार कायद्याला 20 वर्ष पूर्ण

झाली, मात्र जनतेला दिलेल्या या महत्वाच्या अधिकाराची धार भाजपा सरकार बोथट करत आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यामुळे काँग्रेस पक्ष हा कायदा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**खासदार-क्रीडा महोत्सव**

पहिला 'खासदार क्रीडा महोत्सव' पुण्यात येत्या 2 ते 16 नोव्हेंबर या कालावधीत पार पडणार आहे. या महोत्सवात शहरातील विविध मैदानांवर एकंदर 35 प्रकारच्या क्रीडा स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. महोत्सवात खेळाडूंबरोबरच ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग खेळाडू यांनाही आपलं कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. सर्व स्पर्धांमध्ये 20 ते 25 हजार खेळाडूंचा सहभाग अपेक्षित आहे.

**क्रिकेट-भारत-वेस्टइंडीज**

नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर सुरु असलेल्या भारत आणि वेस्ट इंडीज क्रिकेट संघांदरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात कालच्या तिसऱ्या दिवसअखेर वेस्ट इंडीजच्या दुसऱ्या डावात 2 गडी बाद 173 धावा झाल्या आहेत. वेस्ट इंडीज संघ अजूनही 97 धावांनी पिछाडीवर आहे. भारताने दिलेल्या 518 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाहुण्या संघाचा पहिला डाव 248 धावांत संपुष्टात आल्यामुळे त्यांच्यावर फोलो-ऑनची नामुष्की ओढवली. भारताने पहिल्या डावात पाच गडी बाद 518 धावसंख्येवर डाव घोषित केला.

**महिला क्रिकेट विश्वचषक**

महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल विशाखापट्टणममध्ये झालेल्या चुरशीच्या सामन्यात ऑस्ट्रेलिया संघाने भारतीय संघाचा पराभव केला. भारताने प्रथम फलंदाजी करताना 330 इतकी मोठी धावसंख्या उभारली. स्म्रिती मान्धानाने 66 चेंडून 80 धावा फटकावल्या. याचबरोबर, स्मृतीनं आपल्या करकीर्दीतील 5 हजार धावांचा टप्पा पार केला तसार एक दिवसीय सामन्यांमध्ये, एकाच वर्षात 1 हजार धावा पूर्ण करत तिने इतिहास रचला. भारतानं दिलेलं 331 धावांचं आव्हान ऑस्ट्रेलियानं तीन खेळाडू राखून पूर्ण केलं.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज आहे, तर विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. दरम्यान राज्यातील हवामानात येत्या 15 तारखेपासून बदल अपेक्षित असून 18 ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. शेतकऱ्यांनी हवामानाच्या स्थितीनुसार नियोजन करावं आणि काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावं असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार